Enclosure - 2

नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि./704/बी/1257

दिनांक : 29 जून 2004

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
वैनगंगा बहुउद्देशिय विकास संस्था
10, कार्पोरेशन कॉलनी, उत्तर अंबाझरी मार्ग,
नागपूर.

विषय :– बाजीरावजी करंजेकर कॉलेज ऑफ फार्मसी, साकोली च्या संलग्निकरणाबाबत.
संदर्भ :– रिट याचिका क्रमांक 2676/2004 मधील मा.उच्च न्यायालयाचे दिनांक 29 जून 2004 चे आदेश.

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेचे बाजीरावजी करंजेकर कॉलेज ऑफ फार्मसी, साकोली येथे सत्र 2004–05 पासून सुरु करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने पत्र क्रमांक 06/07/एमस/ईएनजीसी/2004/029, दिनांक 11 मे, 2004 नुसार व राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासन निर्णय क्रमांक टीईएम–2004/(235/04)/तांशि–1, दिनांक 1 जून 2004 नुसार दिलेली परवानगी आणि मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने रिट याचिका क्रमांक 2676/2004 वर दिनांक 29 जून 2004 रोजी दिलेला अंतरिम आदेश विचारात घेऊन B.Pharm. अभ्यासक्रमाचे 60 विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह प्रस्तुत महाविद्यालयास सत्र 2004–05 पासून तात्पुरते संलग्निकरण (Provisional Affiliation) प्रदान करण्यात येत आहे.

तात्पुरत्या स्वरुपात (Provisional Affiliation) प्रदान करण्यात आलेले संलग्निकरण मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठा समोर प्रलंबित असलेल्या रिट याचिका क्रमांक 2676/2004 वरील पुढील आदेशाचे अधिनस्थ राहून प्रदान करण्यात आले आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला,

सहायक कुलसचिव (म.वि.),
नागपूर विद्यापीठ.

प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषित :–

1. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–32.
2. सहायक संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई–1.
3. सह–संचालक, तंत्रशिक्षण विभाग, नागपूर विभाग, नागपूर.
4. परीक्षा नियंत्रक, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
5. वित्त व लेखा अधिकारी, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
6. उपकुलसचिव (विद्या), नागपूर विद्यापीठ, नागपूर.
7. सहायक कुलसचिव, (व्यावसायीक/परीक्षा व चौकशी/गोपनिय), नागपूर विद्यापीठ.
8. अधिक्षक, संलग्निकरण शाखा (म.वि.) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
9. अधिक्षक, शिक्षक मान्यता शाखा (म.वि.), नागपूर विद्यापीठ, नागपूर.

Principal
B. K. College of Pharmacy
Sakoli, Dist. Bhandara (M.S.)
Pin - 441802

सहायक कुलसचिव (म.वि.),
नागपूर विद्यापीठ.